आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७ वाजता

४ ऑक्टोबर २०२३ – बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात १०० रुपयांची वाढ करण्याचा केंद्रीय मंत्रीमंडळाचा निर्णय

- राज्यातल्या १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्र्यांकडून जाहीर / पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे

- दोन शासकीय रुग्णालयांमधे मोठ्या प्रमाणात रुग्णांचे मृत्यू झाल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाची राज्य शासनाला नोटीस

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची आज दोन सुवर्णपदकांसह ११ पदकांची कमाई

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास उद्यापासून सुरू होण्याची शक्यता

**<><><><><><><>**

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात 100 रुपयांची वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहरांना ही माहिती दिली. पूर्वी अनुदानाची रक्कम 200 रुपये प्रती सिलेंडर होती, ती आता 300 रुपये प्रती सिलेंडर करण्यात आली. आज केंद्रीय मंत्रीमंडळात अनेक निर्णय घेण्यात आले. त्यात आंतरराज्य नदी विवाद कायदा 1956 अंतर्गत तेंलगणा आणि

आंध्र प्रदेश यांच्यातल्या कृष्णा पाणी विवाद न्यायाधिकरण-२ मधल्या संदर्भ अटींना मान्यता देण्यात आली. त्याच बरोबर तेलंगणा इथं सम्मक्का सरक्का केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी केंद्रीय विद्यपीठ कायदा 2009 मध्ये बदल करायलाही मान्यता दिली. राष्ट्रीय हळद मंडळ स्थापन करायला मंजुरी देण्यात आली, अशी माहिती केंद्रीय संस्कृती आणि पर्यटनमंत्री जी किशन रेड्डी यांनी दिली. या मंडळामुळे हळदीचं आहारतलं महत्त्वं या संदर्भात जागरुकता निर्माण करायला, तसंच हळदीची निर्यात करायलाही मदत मिळेल, असंही ते म्हणाले.

**<><><><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केली. सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील असतील तर सोलापूर आणि अमरावती जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे.

भंडाऱ्याचे पालकमंत्री विजयकुमार गावित, तर बुलढाण्याचे पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील असतील. हसन मुश्रीफ यांच्याकडे कोल्हापूर, तर धर्मराव बाबा आत्राम यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याची जबाबदारी आली आहे. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे,तर परभणीचे संजय बनसोडे असतील. अनिल पाटील यांच्याकडे नंदुरबार जिल्हा तर सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे वर्धा जिल्हा पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे.

**<><><><><><><>**

राज्यातल्या दोन शासकीय रुग्णालयांमधे मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे मृत्यू झाल्याच्या घटनेची स्वतःहून दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं राज्य शासनाला नोटीस बजावली आहे. सरकारी रुग्णालयांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीचा तपशील उद्या सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ यांना दिले आहेत. या प्रकरणी खाटा, जीवनावश्यक औषधं यांचा तुटवडा असल्याची सबब खपवून घेतली जाणार नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात दोन दिवसांच्या कालावधीत ३१ रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची दखल न्यायालयाने आपणहून घ्यावी, अशी मागणी करणारा अर्ज मोहित खन्ना या वकिलानं आज दाखल केला होता. रुग्णालयातली पदांची स्थिती, औषधं, आणि शासकीय खर्च याची तपशीलवार माहिती घेऊन नंतर रीतसर याचिका दाखल करावी, असं न्यायालयानं खन्ना यांना सांगितलं.

छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयातही दोन दिवसात १४ रुग्णांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे.

<><><><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या तयारीचा संघटनात्मक आढावा आज मुंबई भाजपाच्या गाभा समितीच्या बैठकीत घेण्यात आला. मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मुंबईतल्या सहाही लोकसभा मतदारसंघांमधली संघटनात्मक रचना, बदललेली राजकीय स्थिती याबाबत चर्चा झाली. तसंच आगामी काळातल्या कार्यक्रमांचं नियोजन करण्यात आलं.

<><><><><><><>

रिझर्व बँकेच्या वित्त आणि पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरु झाली. या नंतर वित्त आणि पत धोरण आढावा रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता जाहीर करतील, आणि नंतर पत्रकारपरिषद घेतील. गेल्या आढाव्यात व्याजदरांमधे कोणताही बदल रिझर्व बँकेनं केला नव्हता. सध्या रेपो दर साडेसहा टक्के तर रिव्हर्स रेपो दर तीन पूर्णांक ३५ शतांश टक्के आहे. बँक दर पावणेसात टक्के आहे. चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज रिझर्व बँकेने आतापर्यंत व्यक्त केला आहे.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदीच पुन्हा प्रधानमंत्री होतील, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी आज घर चलो अभियानातंर्गत सातारा शहरातल्या बाजारपेठेत पदयात्रा काढून व्यापाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

**<><><><><><>**

चीन इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आतापर्यंत 80 पदकं मिळाली आहेत. यात 17 सुवर्ण, 31 रौप्य आणि 32 कांस्य पदकांचा समावेश आहे. या पदकां बरोबरंच भारत चौथ्या स्थानावर आला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतली भारताची उत्कृष्ट कामगिरी आहे. आज 11 व्या दिवशी भारताची कामगिरी कौतुकास्पद होती. तिरंदाजीत ज्योती सुरेखा वेण्णम आणि ओजस देवतळेनं कंपाउंड मिक्स प्रकारात दक्षिण अफ्रिकेला नमवत सुवर्ण पदक जिंकलं. भालाफेकीत नीरज चोप्रानं 88 पूर्णांक 88 शतांश मीटर लांब भाला फेकत सुवर्ण पदक पटकावलं, तर किशोर जेनाला रौप्य पदक मिळालं. मुष्टीयुद्धात 75 किलो

वजनी गटात लवलीना बोर्गोहेनला रौप्य, तर परवीन हुडाला 57 किलो वजनी गटात कांस्य पदक मिळालं. स्कॉश मध्ये अभय सिंग आणि अनाहत सिंग या मिश्र जोडीनं उपांत्य सामन्यात हाँगकाँगच्या जोडीला नमवत कांस्य पदक जिंकलं. आज सुरुवातीला चालण्याच्या 35 किलोमिटर मिश्र शर्यतीत राम बाबू आणि मंजू राणीनं कांस्य पदक जिंकून चांगली सुरुवात केली. महिलांच्या 800 मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमिलन बैसला रौप्य आणि पुरुषांच्या 5 हजार मीटर स्पर्धेत अविनाश साबळेला रौप्य पदक मिळालं. 4 बाय 400 मीटर रिले महिला स्पर्धेत भारताला रौप्य पदक मिळालं.

**<><><><><><>**

‘आयसीसी -एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा’ उद्यापासून भारतात सुरु होत आहे. पहिला सामना उद्या अहमदाबाद इथं इंग्लड आणि न्यूझीलंड याच्यात होणार आहे. याआधी यजमानपदी असताना भारतानं २०११ मध्ये विश्वचषक जिंकला होता. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली यंदाही भारतीय संघ उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास क्रिकेट विश्लेषकांनी व्यक्त केला आहे..

**<><><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून माघार घेण्याचा प्रवास उद्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातून उद्या मान्सून माघार घेईल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मंगळवारपर्यंत संपूर्ण राज्यातून मान्सून बाहेर पडेल, असा अंदाज आहे. जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेशचा काही भाग, मध्य प्रदेशचा उत्तर भाग यातून आतापर्यंत मान्सून माघारी फिरला आहे.

**//<><><><><><>//**